दिनांक 23/08/2022 रोजीचा प्रशासकिय ठराव क्र. 28

विषय – आळसंद व घोगांव जॅकवेल येथे सुधारीत पाणी पुरवठा योजनेसाठी एच.टी.कनेक्शेन लोड वाढविणे कामी खालील अंदाजपत्रके मंजूर करणेकामी निर्णय घेणे.

संदर्भ – दिनांक 19/08/2022 रोजीची इंजिनियर व मुख्याधिकारी यांची टिपणी.

पाणी पुरवठा विभागाकडील अहवालानुसार विटा शहर सुधारीत पाणी पुरवठा योजनेचे काम सध्या सुरू आहे. आळसंद जलशुध्दीकरण केंद्र व घोगांव जॅकवेल येथे नवीन 300 एच.पी.चे मोटर्स व पंप बसविणेत आलेले आहे.तरी ते मोटर्स व पंप सुरू करणेसाठी एच.टी.कनेक्शेन पुर्वीचा लोड कमी आहे तो वाढविणे गरजेचे आहे. यासाठी म.रा.वि.वि.कं.सांगली यांनी सर्व्हे करून खालील कामे करणेबाबत सुचित केले आहे.

1) घोगांव जॅकवेल येथे ए.टी.कनेक्शन लोड वाढविणे कामी इलेक्ट्रीकल सर्किट उभा करणे व तदअनुषंगिक कामे करणे.(अं.र.रू.4,88,744/-)
2) आळसंद जलशुध्दीकरण केंद्र येथे ए.टी.कनेक्शन लोड वाढविणे कामी इलेक्ट्रीकल सर्किट उभा करणे व तदअनुषंगिक कामे करणे.(अं.र.रू.4,97,416/-)
3) आळसंद जलशुध्दीकरण केंद्र येथे एम.एस.ई.बी.चे.मीटर बसविणे कामी शेड बांधणे. (अं.र.रू.4,94,870/-)
4) आळसंद जलशुध्दीकरण केंद्र येथे एम.एस.ई.बी.चे.व्हि.सी.बी.पॅनेल बसविणे कामी शेड बांधणे. (अं.र.रू.4,94,870/-)

तरी वरील कामे अत्यंत तातडीने करून घेणे आवश्यक आहे. वरील कामे ही सुधारित पाणी पुरवठा योजनेच्या टेंडरमध्ये समाविष्ठ नाहीत.कारण सदरची कामे ही एम.एस.ई.बी.चे चार्जेस मधून ठोकळ रक्कम 1 कोटी 98 लक्ष धरणेत आलेली आहे. तरी सदर अंदाजपत्रकांना प्रशासकीय मान्यता देत आहे. याकामी पुढील आवश्यक ती नियमबध्द कार्यवाही करणेत यावी.

सही/-
( संतोष भोर)
प्रशासक
विटा नगरपरिषद, विटा

दिनांक 23/08 /2022 रोजीचा प्रशासकिय ठराव क्र.29

विषय – नगरपरिषद हद्दीत स्वच्छ भारत अभियानांतर्गत स्वच्छ सर्वेक्षणच्या दृष्टीने नगरपरिषद हद्दीतील घरोघरी जावून घंटागाडीद्वारे ओला, सुका व घातक कचरा वेगवेगळा संकलन करणे, रस्ते, सार्वजनिक व सामुदायिक शौचालये, मुता-या तसेच गटर यांची दैनंदिन साफसफाई करणे व कच-याची घनकचरा व्यवस्थापन भूमी पर्यंत वाहतूक करणे इ.कामे करणेस मंजूरी देणेबाबत निर्णय घेणे.

नगरपरिषद हद्दीत स्वच्छ भारत अभियानांतर्गत स्वच्छ सर्वेक्षणच्या दृष्टीने नगरपरिषद हद्दीतील घरोघरी जावून घंटागाडीद्वारे ओला, सुका व घातक कचरा वेगवेगळा संकलन करणे, रस्ते, सार्वजनिक व सामुदायिक शौचालये, मुता-या तसेच गटर यांची दैनंदिन साफसफाई करणे व कच-याची घनकचरा व्यवस्थापन भूमी पर्यंत वाहतूक करणे इ.कामे करणे महत्वाचे आहे.सदरचे काम सन 2018-2019 स्वच्छ सर्वेक्षणमध्ये उच्चतम कामगिरी करणा-या नागरी स्थानिक स्वराज्य संस्थाना देण्यात येणा-या प्रोत्साहनात्मक बक्षीस रक्कम अंतर्गत नगरविकास विभाग,महाराष्ट्र शासन निर्णय क्रं.स्वमअ-2019/प्र.क्र.94/नवि-34 मंत्रालय दि.18 सप्टेंबर2019 मधील विवरणपत्रातील अ.क्रं.1 मधील काम क्र.1) नुसार करणे अनुज्ञेय आहे.

त्यानुसार नगरविकास विभाग, महाराष्ट्र शासन निर्णय क्र.नपावै-2021/प्र.क्र.195(4)/न.वि-16 मंत्रालय दि.23 नोव्हेंबर 2021 ने स्वच्छ सर्वेक्षण 2018 व स्वच्छ सर्वेक्षण 2019 मध्ये उच्चतम कामगिरी करणा-या नागरी स्वराज्य संस्थाना देण्यात येणा-या प्रोत्साहनात्मक बक्षीस रक्कमेचा दुसरा हप्ता र.रू.7.50 कोटी प्राप्त झाला आहे.

तरी सदरचे काम सन 2018-2019 स्वच्छ सर्वेक्षणमध्ये उच्चतम कामगिरी करणा-या नागरी स्थानिक स्वराज्य संस्थाना देण्यात येणा-या प्रोत्साहनात्मक बक्षीस रक्कमेतून करणेस मान्यता देत आहे. याकामी पुढील आवश्यक ती नियमबध्द कार्यवाही करणेत यावी.

सही/-
( संतोष भोर)
प्रशासक
विटा नगरपरिषद, विटा